RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८७

दि.२५ जुलै २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# लातूरमध्ये ‘छात्रों की गूंज... विद्यार्थ्यांचा एल्गार’ मोर्चा उत्साहात संपन्न

## NEET पेपरफुटीच्या निषेधार्थ केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी; अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा एल्गार



**लातूर/ प्रतिनिधी:** देशातील विद्यार्थ्यांवर होणाऱ्या अन्यायाचा निषेध, NEET पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, शिक्षण क्षेत्रातील पेपरफुटी कायमची रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी तसेच सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि लातूरकरांच्या वतीने ‘छात्रों की गूंज... विद्यार्थ्यांचा एल्गार’ मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख आणि ‘ट्वेंटीवन ग्री’च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मोर्चा उत्साहात पार पडला.

उद्योग भवन परिसरातील अष्टविनायक मंदिर (ट्यूशन एरिया) येथून मोर्चाला सुरुवात झाली. सीताराम नगर, नंदी स्टॉप आणि औसा रोडमार्गे मार्गक्रमण करीत मोर्चाचा समारोप शहीद स्मारक, लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आला. मोर्चामध्ये विद्यार्थी, पालक, काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात ‘आवाज विद्यार्थ्यांचा, भारताच्या उज्ज्वल भविष्याचा’, ‘शिक्षण वाचवा, भविष्य वाचवा’ अशा आशयाचे फलक झळकत होते. तसेच ‘धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या’, ‘केंद्र सरकार हाय-हाय’ अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

शिक्षण क्षेत्रातील वाढत्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होत असून, मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पेपरफुटीच्या घटनांना कायमचा आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कठोर आणि प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आली.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर ड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे, लातूर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष निलेश देशमुख, लातूर शहर युवक काँग्रेस अध्यक्ष विष्णुदास धायगुडे, NSUI जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, NSUI शहराध्यक्ष व्यंकटेश झिपरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच परिवहन समितीचे सभापती फैजल कायमखानी, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, माजी महापौर दीपक सुळ यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, युवक काँग्रेस, छडणखचे पदाधिकारी व कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक आणि लातूरकर नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या मोर्चाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडत शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्याची मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारने गांभीर्याने विचार करून तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

## विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम; लातूर शहर मतदारसंघात मतदारयादी अद्यावतीकरणासाठी मतदारांनी सहकार्याचे आवाहन





**लातूर/ प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार २३५ लातूर शहर विधानसभा मतदारसंघाअंतर्गत मतदारयाद्या शंभर टक्के अद्यावत करण्यासाठी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम वेगाने राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदारयादीशी मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे अनिवार्य असून, मॅपिंग न झाल्यास मतदारांना निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांसमोरील सुनावणी प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते, त्यामुळे सर्व मतदारांनी या मोहिमेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील मतदारांच्या मॅपिंगसाठी सर्व बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक घरोघरी जाऊन माहिती संकलन, अस्पष्ट छायाचित्रे अद्यावत करणे, डीएसई नोंदींची पडताळणी तसेच ईएफ (ईएफ) फॉर्मचे संकलन व डिजिटायझेशनचे काम ३० जून २०२६ ते ०८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पूर्ण करत आहेत. या कामाच्या सुलभतेसाठी तहसील कार्यालय येथे मतदार मदत कक्ष आणि बीएलओ मदत कक्ष उभारण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी नुकतीच सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांची बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतला तसेच प्रत्यक्ष यादी भाग ३१ ते ६० च्या बीएलओंची भेट घेऊन मार्गदर्शन केले व प्रत्यक्ष घरभेटी देऊन मतदारांना सहकार्याचे आवाहन केले.

भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार २० ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओ प्रशिक्षण व यादी छपाई, ३० जून ते ०८ ऑगस्ट २०२६ दरम्यान घरोघरी जाऊन माहिती संकलन, १७ ऑगस्ट २०२६ >> पान २

## पोकरा टप्पा-२ अंतर्गत लातूर जिल्ह्यात ठिबक व तुषार सिंचनासाठी डिजिटल चलनाद्वारे अग्रिम अनुदानाची सुविधा

**लातूर/ प्रतिनिधी:** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा-२ अंतर्गत राज्य शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील शेतकरी तसेच सर्व महिला शेतकऱ्यांना ठिबक सिंचन व तुषार सिंचन या घटकांसाठी सेंट्रल बँक डिजिटल चलन या आधुनिक डिजिटल प्रणालीद्वारे अनुदान वितरणास मान्यता दिली आहे. या नावीन्यपूर्ण योजनेची अंमलबजावणी लातूर जिल्ह्यातील निवडलेल्या २१६ गावांमध्ये करण्यात येणार आहे.

यापूर्वीच्या पद्धतीनुसार सिंचन संचाचे काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम दिली जात होती. त्यामुळे सुरुवातीचे भांडवल उपलब्ध नसल्याने अनेक गरजू शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही अडचण दूर करण्यासाठी आता राज्य शासनाने सेंट्रल बँक डिजिटल चलनच्या टोकन माध्यमातून अग्रिम अनुदान उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू केली आहे.

या नवीन पद्धतीत इच्छुक शेतकरी प्रकल्पाच्या डीबीटी (डीबीटी) पोर्टलवर अर्ज करताना सेंट्रल बँक डिजिटल चलन हा पर्याय निवडू शकतील. त्यानंतर



पंजाब नॅशनल बँकेमार्फत डिजिटल चलन ॲपवर नोंदणी करून शेतकऱ्यांच्या सेंट्रल बँक डिजिटल चलन वॉलेटमध्ये अनुदानाच्या रकमेइतके डिजिटल टोकन उपलब्ध करून दिले जाईल. हे टोकन केवळ कृषी विभागाकडे नोंदणीकृत असणाऱ्या आणि सेंट्रल बँक डिजिटल चलन प्रणालीमध्ये सहभागी असलेल्या अधिकृत विक्रेत्यांकडूनच ठिबक किंवा तुषार सिंचन संच खरेदी करण्यासाठी वापरता येईल.

शेतकऱ्यांकडून सिंचन संचाची खरेदी व बसवणी पूर्ण झाल्यानंतर, कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी केली जाईल. त्यानंतर अंतिम मंजुरी मिळताच संबंधित विक्रेत्याच्या सेंट्रल बँक डिजिटल चलन वॉलेटमधील ब्लॉक केलेली अनुदानाची रक्कम अनब्लॉक करून प्रत्यक्ष अदा करण्यात येईल. अंतिम मंजुरी मिळण्यापूर्वी ही रक्कम वापरता येणार नाही. या संपूर्ण प्रक्रियेमुळे अनुदान वितरण अधिक पारदर्शक, सुरक्षित, जलद आणि उद्देशपूर्ण होणार असून अनुदानाचा वापर केवळ मंजूर कृषी घटकासाठीच केला जाईल. यामुळे शेतकऱ्यांवरील सुरुवातीच्या गुंतवणुकीची अडचण दूर होऊन सूक्ष्म सिंचनाचा अधिक व्यापक प्रसार होण्यास मदत होणार आहे.

तरी प्रकल्पांतर्गत निवडलेल्या २१६ गावांतील पात्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील शेतकरी तसेच सर्व महिला शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन व तुषार सिंचन घटकांसाठी सेंट्रल बँक डिजिटल चलन या आधुनिक प्रणालीद्वारे अर्ज करून या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी अथवा समूह सहायकांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये डेंग्यू प्रतिबंधात्मक जनजागृती उपक्रम व पावसाळ्यातील आजाराविषयी मार्गदर्शन



**लातूर/ प्रतिनिधी:** दि.२३ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभाग,लातूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद विज्ञान महाविद्यालयात मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त डेंग्यू प्रतिबंधात्मक जनजागृती उपक्रम अंर्तगत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डेंग्यू आजाराविषयी मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी लातूर मनपा साथरोग तज्ज्ञ डॉ.ऋषिकेश खरोळकर यांनी डेंग्यूची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय व शासनाच्या विविध योजना याबद्दल माहिती दिली.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, डॉ.हेमंत वरूडकर यांचेही प्रोत्साहन मिळाले.

ार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे (वाडीकर) यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.व्ही.ए. कैले यांनी केले.यावेळी लातूर मनपा आरोग्य निरीक्षक पार्श्वनाथ पाटील, आरोग्य कर्मचारी कर्मचारी प्रकाशनगर शुभम जाधव, आशा स्वयंसेविका माया राऊत व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘दिलखुलास’ आणि ‘जय महाराष्ट्र’ मध्ये शेतकरी कर्जमाफी संदर्भात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांना नवी उमेद देणाऱ्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’ या महत्त्वपूर्ण निर्णयाविषयी सविस्तर माहिती देणारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘जय महाराष्ट्र’ आणि ‘दिलखुलास’ या लोकप्रिय कार्यक्रमांमधून प्रसारित होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने शासनाने शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६’ जाहीर केली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचा भार कमी करून त्यांना नव्या उमेदीने शेती करण्यासाठी सक्षम करणे, आर्थिक स्थैर्य प्रदान करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे.

या विशेष मुलाखतीमध्ये सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी योजनेची उद्दिष्टे, पात्रता, लाभाचे स्वरूप, लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया, अंमलबजावणीची कार्यपद्धती तसेच शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कसा लाभ मिळणार आहे, याची सोप्या आणि सविस्तर शब्दांत माहिती दिली आहे. योजनेबाबत असलेल्या विविध प्रश्नांची उत्तरेही या मुलाखतीतून मिळणार असून, प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या या निर्णयाची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

‘दिलखुलास’ कार्यक्रमातून ही मुलाखत दि. २७ व २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून; तसेच ‘न्यूज ऑन एआयआर’ या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे.

‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमामध्ये ही विशेष मुलाखत मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे; तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही ही मुलाखत उपलब्ध होईल. या मुलाखतीचे निवेदन डॉ.मृण्मयी भजक यांनी केले आहे.



# लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. कराड यांनी केले

## हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांचे विचार : श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन

**लातूर/ प्रतिनिधी:** लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी पंढरपूर येथे बोलताना व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच, ह.भ.प. तुळशीराम दा कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा. विलास कथुरे उपस्थित होते.

हिंदकेसरी पै. दिनानाथ सिंग म्हणाले, ''हा सोहळा मन आणि चित्त प्रसन्न करतो. त्यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला तीर्थक्षेत्रात आल्याची अनुभूती मिळते. डॉ. कराड यांनी वैष्णवांच्या मेळाव्यात कुस्तीचा आखाडा भरविला आहे. येथे भक्ती आणि शक्तीचा आदर्श उभा राहिलेला दिसत आहे''.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. याच परंपरेचे पाईक विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखविली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे.

श्रीकांत देशमुख म्हणाले, संस्कृती आणि परंपरा टिकवणारी ही प्रथा पुढे चालवत डॉ. विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात कुस्तीचे आयोजन केले. वारकरी हा काटक आहे. डॉ. कराड यांच्या कार्यासमोर सर्व पुरस्कार नगण्य असून त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

प्रा. विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले. बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

---

## लातूरच्या प्रभाग २ मध्ये महिलांसाठी मोफत शिलाई मशिन प्रशिक्षण केंद्राचा ट्वेंटी वन ॲग्रो लि.संचालिका सौ. अदितीताई देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ

**लातूर/ प्रतिनिधी:** महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने लातूरच्या विलासराव देशमुख फाउंडेशनकडून विविध उपक्रम राबवले जातात.याचाच एक भाग म्हणून लातूर शहरातील वेगवेगळ्या भागात महिलांसाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र सुरु केले जात आहेत.

लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ०२ मधील विठ्ठल रुक्मिणी मंदिर,हरिभाऊ नगर,यासह परिसरातील महिलासाठी मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र क्र. १७ चा शुभारंभ सोहळा ट्वेन्टी वन ॲग्रो लि.च्या संचालिका सौ.अदितीताई अमित देशमुख यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात संपन्न झाला.

विलासराव देशमुख फाउंडेशन लातूरच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्य विकास उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सुरू करण्यात येणाऱ्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रात महिलांना आधुनिक पद्धतीने शिलाईचे प्रशिक्षण देण्यात येणार असून,प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी देखील मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

या बोलताना ट्वेन्टी वन अग्रो लि.च्या संचालिका सौ. अदितीताई अमित देशमुख म्हणाल्या की, महिलांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी या कौशल्याचा उपयोग करून त्यांच्यामध्ये आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशन काम करत आहे हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात येत आहे.आज पर्यंत विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून ७ हजारांपेक्षा अधिक महिला भगिनींना रोजगारभीमुख प्रशिक्षण देण्यात आले आहे.



या उपक्रमाअंतर्गत महिलाना शिलाई मशीन,ब्युटी पार्लर,इंग्लिश स्पोकन रिटेल सेल्स,केक तयार करणे असे विविध कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.याचा लातूर शहरातील व परिसरातील महिलांना उपयोग होत आहे.त्याचबरोबर विलासराव देशमुख फाउंडेशन कडून व्ही. डी. एफ बाजार ही संकल्पना राबविण्यात येत आहे याच्या माध्यमातून शहरातील व शहरालगतच्या परिसरातील महिलांना एक हक्काची बाजारपेठ तयार करण्याचे काम विलासराव देशमुख फाउंडेशनच्या माध्यमातून झाले आहे.

या कार्यक्रमासाठी लातूर शहर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, विलासराव देशमुख फाउंडेशन स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या विभाग प्रमुख श्रीमती संगीता मोळवणे,मनपा सदस्य अँड. शेख फारूक,शहेनाज असिफ गोलंदाज,अंकिता भडिकर,शिलाताई वाघमारे,सोशल मीडिया प्रमुख प्रवीण सूर्यवंशी,मंदाकिनी पेठे,रोहिणी शिंदे,रसाळ मॅडम,ट्रेनर जिन्नत शेख,समनव्यक गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह परिसरातील प्रशिक्षण घेणाऱ्या महिला भगिनी,महिला बचतगट सदस्य, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दरम्यान या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल,गरजू तसेच ग्रामीण व शहरी भागातील महिलांना कौशल्य आत्मसात करून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन मिळणार असून महिलांना रोजगारक्षम बनविणे,त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल घडविणे हा या उपक्रमा मागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी यावेळी बोलताना सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यवान कांबळे यांनी केले.

---

पान १ वरून...

### विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम; लातूर शहर मतदारसंघात मतदारयादी अद्यावतीकरणासाठी मतदारांनी सहकार्याचे आवाहन

रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्धी, १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ दरम्यान दावे व हरकती स्वीकारणे, १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दावे-हरकती निकाली काढणे आणि १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे. याशिवाय मोजलेल्या मतदारांचे डिजिटायझेशन २८ जुलै २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आणि अनुपस्थित, स्थलांतरित व मयत मतदारांच्या याद्या बीएलए यांना उपलब्ध करून देऊन त्यांचे इतिवृत्त प्रणालीवर अपलोड करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.

नागरिकांना voters.eci.gov.in या पोर्टलवरून घरबसल्या नाव तपासणे, बीएलओ व मतदान केंद्राची माहिती मिळवणे आणि ई-फॉर्म ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय, नागरिकांच्या सोयीसाठी सर्व बीएलओ दररोज सायंकाळी ४ ते ६ या वेळेत आपापल्या मतदान केंद्रांवर अनिवार्यपणे उपस्थित राहणार आहेत. मतदारांनी या वेळेत बीएलओंची भेट घेऊन ईएफ फॉर्म वाटप व डिजिटायझेशनची माहिती घ्यावी आणि मतदारयादी अद्यावत करण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

---

## संपादकीय...

### वारी-ईश्वराने दिलेल्या मानवी जन्माचे सार्थक करण्याचा हा आनंदसोहळा

विठ्ठलाच्या भक्तीने प्रेरित वारी ही केवळ पंढरपूरची यात्रा नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाला जोडणारी अखंड परंपरा आहे. संतविचार, समता, लोकशिक्षण आणि सामूहिक साधनेचा संदेश देणारी ही वारी महाराष्ट्राच्या संस्कारांचा जिवंत आत्मा आहे. श्रीविठ्ठलाच्या भेटीची आस घेऊन लाखो पावले पंढरीकडे निघतात ती म्हणजे वारी. हा केवळ धार्मिक किंवा भक्ती सोहळा नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. शेकडो वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा महाराष्ट्राला एकसंध ठेवणारी, संतविचारांचा प्रसार करणारी आणि समाजाला नैतिकतेची दिशा देणारी आहे. वारी एक जीवनपद्धती आहे, सामूहिक साधना आहे, लोकशिक्षणाची प्रभावी यंत्रणा आहे आणि संतांनी घडविलेल्या महाराष्ट्राच्या संस्कारांचा अविभाज्य भाग आहे. वारी म्हटले की, डोळ्यांसमोर टाळ-मृदंगांच्या गजरात, मुखी विठ्ठलनाम आणि हृदयात भक्तिभाव घेऊन पंढरपूरच्या दिशेने चालणाऱ्या लाखो वारकऱ्यांचे चित्र उभे राहते. 'वारकरी' या शब्दाचा अर्थ वारी करणारा असा आहे. वर्षानुवर्षे, पिढ्यान् पिढ्या अत्यंत नियमितपणे ही परंपरा अखंड सुरू आहे. वारकरी पंढरपूरला जातो तो केवळ देवदर्शनासाठी नव्हे, तर आत्मिक समाधानासाठी, संतविचारांच्या अनुभवासाठी आणि भक्तीच्या सामूहिक उत्सवात सहभागी होण्यासाठी. या परंपरेचा केंद्रबिंदू आहे विठ्ठल. विठ्ठल हे श्रीकृष्णाचेच रूप मानले जाते. पुंडलिकाच्या भक्तीने प्रसन्न होऊन विठ्ठलरूपात जणू श्रीकृष्ण पंढरपूरला आले, अशी परंपरा सांगते. त्यावेळी पुंडलिक हे आई-वडिलांच्या सेवेत मग्न होते. देव स्वतः समोर उभा असतानाही त्यांनी प्रथम माता-पित्यांची सेवा पूर्ण केली आणि विठ्ठलाला उभे राहण्यासाठी वीट दिली. ही घटना केवळ भक्तीची नव्हे, तर कर्तव्यनिष्ठेची सर्वोच्च शिकवण आहे. पुंडलिकांमुळेच वारकरी संप्रदायाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांनी स्वतःच्या मोक्षाची याचना केली नाही. भक्तांचा उद्धार कर, अशी विनंती विठ्ठलाकडे केली. यातून वारकरी परंपरेचा मूलभूत विचार स्पष्ट होतो, तो म्हणजे स्वतःपुरता नव्हे, तर सर्वांच्या कल्याणाचा विचार! वारीची सुरुवात नेमकी कधी झाली, याचा ठोस ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही; मात्र ही परंपरा प्राचीन असल्याचे संत साहित्यातील उल्लेखांवरून स्पष्ट होते. वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य म्हणजे, हा वैयक्तिक परमार्थ नसून, सामूहिक परमार्थ आहे. योगमार्ग, ज्ञानमार्ग किंवा इतर अनेक आध्यात्मिक मार्ग वैयक्तिक स्वरूपाचे असतात; मात्र वारी ही समूहाने केली जाते. भजन सामूहिक असते, कीर्तन सामूहिक असते, दिंडी सामूहिक असते. त्यामुळे वारी ही लोकांना जोडणारी, एकत्र आणणारी आध्यात्मिक प्रक्रिया आहे. दिंडी हा वारीचा आत्मा आहे. गावोगावचे वारकरी एकत्र येतात. टाळ-मृदंगाच्या तालावर विठ्ठलनामाचा गजर करत पायी पंढरपूरकडे वाटचाल करतात. या प्रवासात नामस्मरण, अभंग गायन, भारूड, भजन, कीर्तन, फुगड्या, खेळ अशा विविध माध्यमांतून भक्तीचा उत्सव साजरा होतो. त्यामुळे वारी ही केवळ परमार्थ नसून, भक्तीचा आनंदोत्सव ठरते. ईश्वराने दिलेल्या मानवी जन्माचे सार्थक करण्याचा हा आनंदसोहळा आहे. विशेष म्हणजे, वारकरी पंढरपूरला जाऊन काही मागत नाही. नवस करत नाही. विठ्ठलाचे दर्शन हेच त्याचे समाधान असते. त्याला फक्त देवाची कृपा हवी असते. देव आणि भक्त यांच्यातील हा अत्यंत निरपेक्ष संवाद म्हणजे वारी. वारकरी संप्रदायात संगीताला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भजन म्हणजे संगीत. अभंग म्हणजे संगीत. भारूड म्हणजे संगीत. वारीत गाणे, नाचणे आणि खेळणे यांना तितकेच महत्त्व आहे. हा केवळ प्रवचनांचा संप्रदाय नाही, तर लोककलांमधून अध्यात्म जगणारा संप्रदाय आहे. या परंपरेला संघटित स्वरूप देण्याचे मोठे कार्य संत नामदेवांनी केले. विविध दिंड्यांचे एकत्रीकरण करून त्यांनी 'फड' ही संकल्पना निर्माण केली. एका फडात अनेक दिंड्या सहभागी होत. पंढरपूरमध्ये या फडांमुळे वारकरी संघटित झाले. वर्षभर चालणाऱ्या भजन-कीर्तनाच्या परंपरेला त्यांनी शिस्तबद्ध रूप दिले. कीर्तन पद्धतीलाही त्यांनी आकार दिला. वारकरी संप्रदायाला तात्त्विक अधिष्ठान मिळाले ते संत ज्ञानेश्र्वरांमुळे. प्रत्येक धर्माला एक प्रमाणग्रंथ आवश्यक असतो. वारकरी संप्रदायासाठी तो ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्र्वरी'. ज्ञानेश्र्वरांनंतर सर्व संतांनी अभंग रचना केल्या. त्या दिंड्यांमध्ये गायल्या जाऊ लागल्या. त्यामुळे वारकरी परंपरेला समृद्ध साहित्य मिळाले. संत ज्ञानेश्र्वरांच्या समाधीनंतर उत्तर भारतातून परकीय आक्रमणे झाली. अशा काळात महाराष्ट्रात धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य वारकरी संप्रदायाने केले. नंतर मराठ्यांचे राज्य आले. त्यानंतर इंग्रजांचे राज्य आले. या साऱ्या राजकीय उलथापालथीत वारी कधीच थांबली नाही. उलट समाजाला एकत्र ठेवण्याचे कार्य ती सातत्याने करत राहिली. विशेष म्हणजे, वारकरी संप्रदायात धर्मांतराचे एकही उदाहरण दिसत नाही. यामागे संत साहित्याची आणि विठ्ठल भक्तीची ताकद होती. मुंबई विद्यापीठाचे पहिले कुलगुरू अलेक्झांडर ग्रँट यांनी तुकाराम महाराजांच्या अभंगांचा अभ्यास करून त्यांची संशोधित गाथा प्रकाशित करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. संत ज्ञानेश्र्वर, संत नामदेव, संत भानुदास, संत एकनाथ, संत तुकाराम यांनी मराठीत अध्यात्म मांडले. त्यांच्या साहित्याने महाराष्ट्राची मानसिकता घडवली. आजही संतांचे अभंग लाखो लोकांच्या मुखी आहेत. संत साहित्य हेच महाराष्ट्राच्या संस्कारांचे मुख्य स्रोत आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. संतांनी निर्माण केलेल्या नैतिकतेच्या आणि सामाजिक ऐक्याच्या पायावरच छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य उभे राहिले. वारकरी संप्रदायाने समाजात आत्मविश्र्वास, संघटन आणि स्वाभिमानाची भावना जागृत केली. महाराष्ट्राला एका भाषेत, एका सांस्कृतिक धाग्यात बांधण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले. पंढरपूर ही सर्व महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी बनली. गावागावांतील लोक वर्षातून दोनदा येथे एकत्र येऊ लागले. त्यामुळे भाषिक आणि सांस्कृतिक एकात्मता अधिक दृढ झाली. वारकरी परंपरेत पालखीचे आगमन नंतर झाले. सुरुवातीला केवळ दिंड्या असत. वारीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, तिची स्वअनुशासनाची परंपरा. लाखो लोक सहभागी होऊनही वारीला कधी गालबोट लागले नाही. कारण, वारकरी स्वतःला संतांचे पाईक मानतो. संतांच्या विचाराला धक्का पोहोचेल, असे कोणतेही वर्तन तो करत नाही. ही आचारसंहिता कुणी लादलेली नाही. ती संस्कारातून आलेली आहे. वारीची खरी ओळख तिच्या अध्यात्मिक स्वरूपात आहे. ती भौतिक उपयुक्ततेच्या कसोटीवर मोजण्याची गोष्ट नाही. ती अनुभवण्याची गोष्ट आहे. वारकरी संप्रदाय हा गाजावाजा करणारा धर्म नाही. तो भागवत धर्माचीच एक उत्क्रांत परंपरा आहे. विठ्ठल आणि वारकरी परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्राला एकत्र ठेवणारा सांस्कृतिक धागा म्हणजे वारी. महाराष्ट्राचा आत्मा म्हणजे वारी. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारी अनुभवावी. कारण, ती केवळ पंढरपूरची वाट नसून माणसाला स्वतःकडे आणि समाजाकडे नेणारा अध्यात्माचा, समतेचा, संस्कारांचा आणि लोकजीवनाला जोडणारा अखंड प्रवास आहे.

---

# पेपर लीक प्रकरण फास्ट ट्रॅकने चालणार याचे स्वागत;परंतु शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधानांचे काय?

सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की,एकटा धर्मेंद्र प्रधान म्हणजे देश होत नाही,तर देशाची १४५ कोटी जनता म्हणजे देश होतो.कारण देशातील जनता यांना देश सेवा करण्यासाठी लोकप्रतिनिधीच्या रूपात लोकसभेत पाठवित असतो आणि त्यांच्या भावना दुखावणे म्हणजे महा पाप समजल्या जाते.ज्या व्यक्तीमुळे आंदोलनाचे जहर देशभर पसरले आणि ज्या व्यक्तीमुळे आंदोलनाला सुरुवात झाली आणि देशाचे करोडो रूपयांचा चुराडा झाला,आंदोलना दरम्यान शेकडो विद्यार्थी गंभीर जखमी झाले आणि शिक्षणप्रणालीचा ज्यानी सत्यानाश केला अशा धर्मेंद्र प्रधानला पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिक नाही.अशा व्यक्तीचा सरकार राजीनामा न घेता त्याला खुर्चीला चिकटून ठेवतात यावर प्रधानमंत्री बोलण्यास तयार नाही किंवा राजीनामा घेण्यास तयार नाही ही कुठली लोकशाही आणि कसली सरकार म्हणावी!शनिवार व रविवारला मोर्चा स्थळी लाखोंच्या संख्येने विद्यार्थी येऊ शकतात हे लक्षात घेता मेट्रो सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला व इंटरनेट सेवा सुध्दा बंद ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.यामुळे देशाचे किती नुकसान होत आहे याचा विचार पंतप्रधान का करीत नाही? सरकारला मेट्रो किंवा अन्य वाहतूक बंद करणे चालते परंतु विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे चालत नाही ही कुठली नितीमत्ता म्हणावी!आज विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ पुरा देश पेटून उठला आहे आणि जगभरात विद्यार्थी आंदोलनाची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे तरीही धर्मेंद्र प्रधानचे लाड सरकार करीत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल.यामुळे देशातील जनतेला शंका आहे की, सरकार सत्तेचा दुरुपयोग तर करत नाही ना!आंदोलना दरम्यान असे लक्षात आले की,सरकारच्या नाकावरील माशीही उडणार नाही अशी परिस्थिती अनेक खासदारांच्या लक्षात आली व विविध पक्षातील ६५ खासदारांच्या विनंती वरून २६ दिवसांनंतर सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण सोडले याचे मनापासून स्वागत कारण आज वांगचुक सारख्या शिक्षणतज्ज्ञाची देशाला नितांत गरज आहे.फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून पेपर फुटी व गैरप्रकारांशी संबंधित फौजदारी खटल्याच्या सुनावणीसाठी दिल्ली उच्च न्यायालयाने विशेष जलदगती न्यायालयाची नियुक्ती केली आहे.न्यायिक अधिकारी अनू ग्रोव्हर बालिगा सुनावणी घेतील. तत्पूर्वी, पेपरफुटीच्या घटनांबाबत संबंधित अधिकारी व यंत्रणांना आवश्यक ती सर्व पावले तातडीने उचलण्याचे निर्देश दिल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.माननीय प्रधानमंत्री सर्वप्रथम फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राचे गुन्हेगार धर्मेंद्र प्रधान यांच्यावर कारवाई का करीत नाही? सरकारने जंतर मंतरच्या २ किलोमीटरच्या परिसरात मोबाईल इंटरनेट सेवा बंद केली आहे.इतकेच नाही तर दिल्लीतील मेट्रो सेवा रात्री उशिरा सुरू करण्यात आली आणि शनिवारी व रविवारला बंद राहू शकते.मंगळवारपासून पंतप्रधान निवासस्थानाची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानाबाहेर कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा सर्वा खर्च, वेळ आणि सर्वसामान्य नागरिकांना त्रास हा सर्व प्रकार धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यामुळे होत आहे याची कल्पना सरकारला असुन सुद्धा धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा सरकार घेत नाही किंवा त्यांना बर्खास्त करीत नाही. यावरून असे वाटते की,देश म्हणजे स्वतःची जागीर समजतात की काय असे स्पष्ट दिसून येते आणि राजीनाम्यावर नरेंद्र मोदी सुध्दा मौन धारण करून आहे.देशात हे चाल्लय तरी काय हे कळायला मार्गच रहाला नाही.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की धर्मेंद्र प्रधान म्हणजे देश नाहीच.१४५ कोटी देशाची जनता म्हणजे देश होतो. सरकारने धर्मेंद्र प्रधान यांच्या गुन्ह्यावर व राजीनाम्यावर पांघरूण घालण्यासाठी काही कारण नसताना एनटीए च्या ४७ अधिकाऱ्यांना हटविण्यात आले ही सर्व लौटनकी एकट्या धर्मेंद्र प्रधानला वाचविण्यासाठी सुरू असल्याचे दिसून येते.प्रधानमंत्री मुख्य मागणी बाजुला सारुन पळवाटा काढतांना दिसत आहे.आज ढासळत्या शिक्षणप्रणाली बद्दल आवाज उठविण्यासाठी संपूर्ण देश एकवटला आहे आणि सरकार व माननीय प्रधानमंत्री धर्मेंद्र प्रधानला वाचविण्यासाठी पळवाटा काढत आहे ही बाब लोकशाहीला घातक ठरू शकते.कारण धर्मेंद्र प्रधानच्या चुकीच्या निर्णयामुळेच देशातील विद्यार्थ्यांना आज कठीण परिस्थितीतुन जावे लागत आहे आणि जे शिक्षा क्षेत्रातील खरे गुन्हेगार आहे त्यांना वाचवण्यासाठी सरकार सर्व शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.माझे सरकारला एकच म्हणणे आहे की,पक्ष-विपक्षांचे राजकारण बाजूला सारून विद्यार्थ्यांच्या(सीजेपीच्या) संपूर्ण मागण्यावर सरकारने ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे यातच सरकारची खरी जीत राहील.



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जबरी चोरी, घरफोडी, सोलार प्लांटवर चोरी करणारी टोळी केली जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांची दमदार कामगीरी!

**केज/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यासह केज तालुक्यामध्ये सध्या चोऱ्या, घरफोडी, सोन्याचे दागिने, दरोडे, मोटार सायकल, मोबाइल चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणत वाढलेल्या असून या सर्व बाबीला सर्वसाधरण नागरीक त्रसत झालेले आहेत. सध्या बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असून आता पोलीस प्रशासनानी तपासाची चक्रे वेगाने फिरवत सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात पोलीस प्रशासनाला यश मिळत असल्याचे दिसून येत आहे.

पोलीस अधिक्षक नवनित कॉवत यांच्या मार्गदर्शीनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी दमदार कामगीरी करत. जबरी चोरी,घरफोडी,सोलार प्लांटवर चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद केले आहे. पोलीसांच्या कारवाईमुळे नागरीकांना मात्र दिलासा मिळाला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने व अंमलदार हे पोलीस ठाणे केज येथील गु.र.नं. ४६१/२०२६ कलम ३३१( ४), ३०३( २), ३(५) भारतीय न्याय संहिता मधील आरोपीचा शोध



हा केज उपविभागात घेत असतांना पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांना एका खबऱ्या मार्फत माहिती मिळाली की, काही दिवसापूर्वी प्रकाश उर्फ गुड्ड्या काळे रा.मोहा त्याने त्याच्या मित्रासह त्याच्याकडील पांढऱ्या रंगाच्या स्कार्पिओ गाडी क्रमांक एम.एच.१२ एच.एफ. ४२४५ या क्रमांकाच्या स्कार्पिओ गाडीने धारूर येथे रात्रीच्या वेळी जाऊन दहा शेळ्या आणल्या होत्या. व त्या काही दिवसापूर्वी शेळ्या विक्री केल्या आहेत.

तसेच दोन दिवसा पुर्वी केज येथून कॉपर (तांबे) चोरी केले आहे. व तो आज ते कॉपर विक्री करण्यासाठी कळंब येथे जाणार आहे. सदरील मिळालेली माहिती माहितीची खात्रीशीर वाटल्याने पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांचे पथक हे मोहा गावाच्या दिशेने रवाना झाले. दुपारी २-०० वाजण्याच्या सुमारास हॉटेल कुलस्वामिनी पासून मोहा गावात जाणाऱ्या रस्त्याने जात असताना गुप्त खबऱ्यांनी दिलेल्या बातमी अनुसार सदरील स्कार्पियो गाडीत एकूण सहा ईसम प्रकाश उर्फ गुड्ड्या शहाजी काळे, शहाजी शेषराव पवार, संतोष बारीकराव शिंदे हे तिघेजण रा.मोहा ता. कळंब दिनेश नागनाथ काळे राहणार कुरने नगर ता. जि.धाराशिव महेश शिवाजी पवार रा.मोहा, अशोक हिम्मत शिंदे रा. मोहा असे सहा जण मिळून आले. यातील दोन आरोपी हे पोलीस पथकास धक्का देऊन पळून गेले, यातील प्रकाश उर्फ गुड्डुया यास शेळी चोरी व कॉपर चोरी बाबत विचारणा केली असता त्याने धारूर तालुक्यातील आडस येथून त्याच्या वरील नमूद साक्षीदारासह जाऊन आखाड्यातील झोपलेल्या इसमास मारहाण करून बारा शेळ्या चोरी केल्या होत्या. तसेच केज तालुक्यातील कानडी माळी व मस्साजोग येथील सोलार प्लांट मधून अर्थिंग रॉड व वायर चोरी केले होते. तसेच त्याने साक्षीदार सह नेकनूर हद्दीतील येळंबघाट येथे जाऊन रात्रीची घरफोडी केल्याचे कबूल केले. त्याच्या ताब्यातून गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेल्या हत्यार व वाहनासह ६ लाख ७९ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला आहे.

आरोपीकडून उघडकीस आलेल्या गुन्ह्याची माहिती :-धारूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२६८/२०२६ कलम ३०९(६),३(५) भारतीय न्याय संहिता नुसार, नेकनूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२७६/२०२६ कलम ३३१(४),३०५(ए) भारतीय न्याय संहिता नुसार, केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४६१/२०२२६ कलम ३३१(४),३०३(२) भारतीय न्याय संहिता नुसार, केज पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३४७/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम,सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोहवा/घोडके, जफर पठाण, दिलीप गीते, भागवत शेलार, दीपक खांडेकर, अर्जुन यादव, मपोहवा/मुंडे, पोअं/अश्रिवनकुमार सुरवसे,चापोहवा/ गणेश मराडे यांनी केली आहे.

## कानडीमाळीत जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण; एका विरुद्ध ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल




**केज/प्रतिनिधी :**केज तालुक्यातील कानडी माळी येथे जातीवाचक शिवीगाळ करून पुन्हा त्याच्या घरी जाऊन मारहाण करून कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी एका विरुद्ध ॲट्रॉसिटी ॲक्ट सह मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. मंगळवारी रोजी सायंकाळी ५-०० वाजण्याचा दरम्यान नानाभाऊ गंगाराम खाडे हे कानाडीमाळी येथील चौकात गिरी यांच्या टपरीच्या समोर रोडवर उभे असतांना किरण मच्छिंद्र राऊत याने तेथे येऊन त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली. नानाभाऊ खाडे यांनी किरण राउत याला याप्रकरणी जाब विचारला असता त्याने नानाभाऊ खाडे यांना मारहाण करून जाती वाचक शिवीगाळ केली. व तु लय माजलास का ? तु माझ्या वडिलांना मच्छिंद्र का म्हणतोस असे म्हणुन जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्याने मारहान केली. उपस्थित असलेल्या गावकऱ्यांनी त्यां भांडणाची सोडवा सोडव केली. त्या नंतर त्यांचा मुलगा विकास खाडे याच्या दुचाकीवर बसुन घरी जात असतांना देखील त्याने चापटा, बुक्क्याने मारहान केली.व पुन्हा त्याच्या घरी जाऊन तुला कुऱ्हाडीनेच तोडतो. असे म्हणत नानाभाऊ खाडे यांची पत्नी, भावजई, मुलगा यांना देखील शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी नानाभाऊ खाडे यांच्या फिर्यादी वरून किरण राऊत याच्या विरुद्ध यांच्या विरुद्ध केज पोलिसात ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आसून, पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम हे करीत आहेत.

## सावळ्याची वारी मधून विठ्ठलभक्तीचा सुरेल गजर; श्रद्धेचा भावस्पर्शी अनुभव देणारं भक्तिगीत

**मुंबई/प्रतिनिधी :** वारी सोहळ्याचं भक्तिमय वातावरण, विठ्ठल नामाचा अखंड गजर आणि वारकऱ्यांच्या अढळ श्रद्धेचा भावस्पर्शी अनुभव देणारं 'सावळ्याची वारी' हे नवीन भक्तिगीत नुकतंच प्रदर्शित झालं आहे. सुरेल संगीत, अर्थपूर्ण शब्द आणि वारीच्या परंपरेचं जिवंत चित्रण यामुळे हे गीत रसिकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे.

या भक्तिगीताला संगीतकार प्रफुल्ल प्रकाश यांनी संगीतबद्ध केलं असून, त्यांनीच आपल्या दमदार आणि भावपूर्ण आवाजात हे गीत साकारलं आहे. विठ्ठलभक्तीचा उत्साह, वारकऱ्यांचा आनंद आणि पालखी सोहळ्याचं दिव्य वातावरण संगीताच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या गीतातून करण्यात आला आहे.

या गाण्याचे बोल कृष्णा वाळके यांनी शब्दबद्ध केले असून, वारीची परंपरा, भक्ती आणि विठ्ठलप्रेम यांचं सुंदर दर्शन त्यांच्या लेखणीतून घडतं. तर सागर वाळके यांनी या गाण्याचं संकलन केलं असून, गीताची दृश्यात्मक मांडणीही आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने प्रदर्शित झालेलं 'सावळ्याची वारी' हे भक्तिगीत प्रत्येक विठ्ठलभक्ताला भक्तिरसात रंगवणारं ठरत आहे. टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि विठ्ठलनामाचा गजर यामुळे हे गाणं वारीचा आध्यात्मिक अनुभव घरबसल्या देतं.

या गाण्याबद्दल गीतकार कृष्णा वाळके म्हणाले, ''सावळ्याची वारी' हे गीत साकारताना वारीचा भक्तिमय उत्साह आणि विठ्ठलभक्तीचा भाव प्रत्येक सुरातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. हे गीत प्रत्येक विठ्ठलभक्ताच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल, असा विश्वास आहे, वारी ही केवळ यात्रा नाही, तर श्रद्धा, समर्पण आणि भक्तीचा अखंड उत्सव आहे. त्या भावनेला शब्दांत मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या गीतातून केला आहे. रसिकांना हे गीत नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.''

## पेपर फुटीच्या खटल्यांसाठी महाराष्ट्रात दोन फास्ट ट्रॅक कोर्ट; पंतप्रधानांच्या घोषणेची अंमलबजावणी

**मुंबई/प्रतिनिधी :** वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'नीट'सह इतर विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपर फुटीप्रकरणी कठोर कारवाई करण्यासाठी आणि संबंधित खटल्यांचा लवकरात लवकर निपटारा करण्यासाठी महाराष्ट्रात दोन 'फास्ट ट्रॅक' न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे ही न्यायालये कार्यरत असणार आहेत.

केंद्र सरकारच्या विशेष विनंतीवरून मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे कार्यकारी मुख्य न्यायाधीश रवींद्र व्ही. घुगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी दोन प्रमुख शहरांमध्ये ही व्यवस्था करण्यात आली आहे. दिल्ली उच्च न्यायालयानेही अशाच प्रकारचे विशेष न्यायालय स्थापन करून तेथे न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगा यांची नियुक्ती केली आहे. त्याच धर्तीवर आता महाराष्ट्रातही ही कार्यवाही करण्यात आली आहे.

नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील ही विशेष न्यायालये 'सार्वजनिक परीक्षा (अन्फेअर मीन्स प्रतिबंधक) कायदा, २०२४' तसेच 'भारतीय न्याय संहिता, २०२३' अंतर्गत दाखल प्रकरणांची सुनावणी घेणार आहेत. विशेष म्हणजे, २०२४ च्या नवीन कायद्यानुसार या न्यायालयांना दाखल झालेल्या खटल्यांची सुनावणी पूर्ण करून तीन महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# जल जीवन मिशन कामाच्या चौकशीला विलंब; तक्रारीनंतरही प्रशासनाकडून हालचाल नाही

## चौकशी न झाल्यास उच्च न्यायालयात धाव घेणार; ॲड. सुनील बगाटे यांचा इशारा

**हिंगोली/विशेष प्रतिनिधी :** औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे जडगाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ₹१.३४ कोटींच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामात कथित अनियमितता झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दाखल करण्यात आली असून, तक्रार दाखल करूनही बराच कालावधी उलटून गेला असतानाही अद्याप कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू न झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या विकासकामांच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



तक्रारीनुसार, जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये गंभीर स्वरूपाच्या त्रुटी असून त्यांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करणे आवश्यक आहे. यामध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम, शासकीय जमीन उपलब्ध असतानाही विहिरीसाठी खाजगी जमिनीचा वापर, गावापासून दूरस्थ ठिकाणी विहिरीचे बांधकाम तसेच योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान झालेल्या कथित प्रशासकीय व तांत्रिक अनियमितता यांसारख्या बाबींचा समावेश असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी जिल्हा प्रशासनाकडे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय चौकशी करण्याची मागणी केली असून, चौकशीत दोषी आढळणारे संबंधित अधिकारी, कंत्राटदार तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित जबाबदार व्यक्तींवर शासकीय नियमांनुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित असताना अशा स्वरूपाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, तक्रार दाखल होऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक हिताशी निगडित महत्त्वाच्या योजनेबाबत आलेल्या तक्रारींवर प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे अपेक्षित असताना होत असलेल्या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

या संदर्भात ॲड. सुनील बगाटे यांनी सांगितले की, जल जीवन मिशनसारख्या महत्त्वाच्या योजनेत सार्वजनिक निधीचा वापर झाला असल्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. प्रशासनाने तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ चौकशीचे आदेश द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे. जर जिल्हा प्रशासनाने यापुढेही चौकशी सुरू केली नाही, तर न्याय मिळविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणात जिल्हा प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसून, संबंधित तक्रारीवर पुढे कोणती कार्यवाही केली जाते, याकडे जडगावसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कारासाठी ऑनलाईन नामांकने सादर करण्यास प्रारंभ

**लातूर/ प्रतिनिधी:** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, केंद्र शासनामार्फत साहसी क्षेत्रात उल्लेखनीय व अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी राष्ट्रीय साहसी पुरस्कार अंतर्गत तेनझिंग नॉर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्कारांतर्गत प्रामुख्याने जमिनीवरील, समुद्रावरील (पाण्यातील) आणि हवाई साहसी उपक्रमांसाठी प्रत्येकी एक तसेच साहसी क्षेत्रातील आजीवन योगदान यासाठी एक स्वतंत्र पुरस्कार प्रदान केला जातो. सन २०२५ च्या या पुरस्कारासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पात्र खेळाडूंकडून ऑनलाइन पद्धतीने नामांकने व प्रस्ताव मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.

या पुरस्कारासाठी शिफारस करावयाच्या खेळाडूंची कामगिरी जमिनीवर, पाण्यात किंवा हवेतील साहसी उपक्रमांमधील अतिउत्कृष्ट असणे आवश्यक आहे. ही कामगिरी मागील तीन वर्षांमधील म्हणजेच सन २०२३, २०२४ आणि २०२५ या कालावधीतील असावी. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार प्राप्त होणारे हे सर्व अर्ज ३० जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या https://awards.gov.in या अधिकृत पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात स्वीकारले जाणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व पात्र व इच्छुक विद्यार्थी, युवक, युवती आणि नागरिकांनी या राष्ट्रीय पुरस्कारासाठी जास्तीत जास्त संख्येने अर्ज करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

# दिवसा रेखी आणि रात्री घरफोडी करणारी टोळी निष्पन्न; एक आरोपी केले जेरबंद!

## ५ लाख किमतीच्या सोन्या, चांदीचा ऐवज हस्तगत; दोन गुन्हे उघडकीस

## बीड जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या धडाकेबाज कारवाया सुरू

**केज/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यात दिवसा रेखी आणि रात्री घरफोडी करणारी टोळी निष्पन्न झाली असून या प्रकरणात एक आरोपीला जेरबंद करण्यात आले असून सदरिल आरोपीच्या ताब्यातून ५ लाख किमतीच्या सोन्या, चांदीच्या दागीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीची अधिक चौकशी केली असता दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. सध्या बीड जिल्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेच्याधडाकेबाजकारवायासुरूआहेत. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक ११ जुलै २०२६ रोजी फिर्यादी हे त्यांच्या राहत्या घरी नातवांसह जेवन करून झोपलेले असताना रात्रीच्या वेळी लघुशंका आल्याने घराच्या बाहेर जाण्यासाठी घराचा दरवाजा उघडून घरा बाहेर आले असता. बाजुच्या रुमचा दरवाजा उघडा असल्याचा दिसुन आला. त्यावरून फिर्यादीने घरामध्ये जावून पाहिले असता लोखंडी कपात उघडे दिसले, घरामधील सामान हे अस्तव्यस्त पडलेले दिसले व कपाटातील सोन्याचे दागीने चोरून नेहल्याचे निदर्शनास आले. तसेच त्यांच्या गावांतील इतर महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागीने चोरीला गेले असल्याच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पिंपळनेर येथे गु.र.नं. २२४/२०२६ कलम ३०४(२),३०५ अ बी. एन. एस. नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदरिल गुन्हा दाखल केल्या नंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थाळाला भेट दिली. तांत्रिक विश्र्लेषन व गोपिनीय बातमीदारा मार्फत

माहिती घेतली असता सदरचा गुन्हा हा खांडवी तांडा ता.गेवराई येथील गुन्हेगारांनी मिळून केल्याचे प्रथमदर्शनी समजून आले. सदरीले गुन्हाहा कृष्णा शेषेराव राठोड रा. अंबुनाईक तांडा गेवराई याने त्याच्या साथीदारासह केला असून तो सध्या त्याच्या सासरीला नाळवंडी तांडा येथे आले असल्याची बातमी मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखच्या पथकाने आरोपी हा बाहेर येताच झडप मारून पकडला. त्यास वरील नमुद गुन्हयासंबंधाने अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कळेल केले. तसेच त्यांनी त्याचे इतर पाच साथीदार असी एकुण सहा जणांनी मिळून गुन्हा केल्याचे सांगितले. सध्या इतर साथीदार फरार आहेत.



आरोपी नामे कृष्णा शेषराव राठोड रा.अंबुनाईक तांडा गेवराई यास आणखी कोठे कोठे गुन्हे केले आहेत याबाबत सविस्तर विचारपूस केली असतात त्यांनी दिनांक ११ जुलै २०२६ रोजी खापरवाडी तांडा वडवणी येथे घरफोडी करून नगदी व सोने चोरून नेल्याचे कबुली दिली आहे. कृष्णा राठोड याच्या कडून पोलीस ठाणे वडवणी येथे गु. र.नं.२२४/२०२६ कलम ३०४ (२),३०५(अ) बी.एन. एस., पोलीस ठाणे वडवणी येथे गु. र.नं.१४१/ २०२६ कलम ३३१(४),३०५(अ) बी.एन. एस. नुसार गुन्हे दाखल असून सदरील दोन गुन्हे आरोपी कडून उघडकीस आले आहेत. कृष्णा राठोड वय २५ वर्षे रा. अंबुनाईक तोडा गेवराई याच्य ताब्यातून चोरीस रोलेले जवळपास तीन तोळे सोने, चांदी दहा भार, अंदाजे किंमत ५ लाख रुपयाचा मुद्दे माले जप्त करून आरोपी व मुद्देमाल पुढील तपसकामी पोलीस ठाणे पिंपळनेर येथे जमा करण्यात आलेअसून पुढील तपास पोलीस हवालदार शरद पवार हे करीत आहेत.

सदरील कारवाई ही पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक समीर शेख, सहाय्यक पोलीसअधिक्षक व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, महेश विघ्ने, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुले शिंदे, अंकुश वरपे, गोवींद राख, पोलीस अंमलदार बबन सलगर, आशपाक सय्यद, चालिक सिध्देश्र्वर मांजरे, सुनिल राठोड यांनी केली आहे.

# शिक्षणामुळे माणूस विवेकवादी बनतो

## शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांचे प्रतिपादन

**लातूर/ प्रतिनिधी:** शिक्षण माणसाला अन्यायाविरुध्द लढण्याची आणि स्वत:चा हक्क मिळवण्याची ताकद देते. शिक्षणामुळे ज्ञान, कौशल्य, स्त्री-पुरुष समानता व समतावादी समाजासह विवेकवादी माणूस निर्माण होतो. समाजातील प्रत्येक घटकाने दर्जे दार शिक्षण घेऊन समतावादी समाज निर्मितीत योगदान द्यावे, असे प्रतिपादन विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात आषाढी एकादशीनिमित्त 'आनंदवारी', गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या ७०च्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा शुक्रवारी पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी प्रमोद पवार, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, तहसीलदार सौदागर तांदळे, शिक्षण सहसंचालक संजय पंचगल्ले, नगरसेविका प्रेरणा होनराव, सामाजिक कार्यकर्ते उमेश निमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मंचावर संस्थाध्यक्ष के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संचालक मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे यांची उपस्थिती होती.

यावेळी नीट व जेईई परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यासोबतच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी स्टार प्रवाह वाहिनीवरील छोटे उस्तादची विजेते तथा संकुलाची विद्यार्थिनी सायली टाक हिने अभंग गायीला. यानंतर पालखीची पूजन करून आषाढी एकादशीनिमित्त 'आनंदवारी' दिंडीचे प्रस्थान करण्यात आले. ही दिंडी राजमाता जिजामाता विद्यालयापासून निघून कोकाटे चौक, बोधेनगर, मंत्रीनगर मार्गे पुन्हा विद्यालयात आल्यानंतर विसर्जीत करण्यात आली. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी साकारलेली पांडुरंग, विठोबा माऊली व रुक्मिणीची वेशभूषा विशेष आकर्षण ठरली. विद्यार्थ्यांच्या या वारकरी दिंडीमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी शिक्षण उपसंचालक चवणे यांना संकुलातर्फे 'लातूर भूषण' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यानंतर प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षण क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल



प्राचार्य केंद्रे यांचे कौतुक केले. यानिमित्त कॉंग्रेस नेते, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी शुभेच्छा संदेश पाठवून प्राचार्य केंद्रे यांना निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी संकुलाचा वाढता यशाचा आलेख मांडला. सूत्रसंचालन अब्दुल गालीब शेख यांनी केले. कार्यक्रमास राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरातील शिक्षण, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रत्येकांनी जीवन वाचवणारे कौशल्य अवगत करणे ही आज काळाची गरज

## लातूरच्या एमआयटीत सीपीआर कौशल्य प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद

**लातूर/ प्रतिनिधी:** हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थीतीत जीव वाचविण्याबाबत करावयाच्या कृतीची जनजागृती करण्यासाठी भारतीय बालरोग संघटना (इंडियन अ‍ॅकॅडमी ऑफ पेडियाट्रीक्स) च्या वतीने जीवन वाचवणारे कौशल्य प्रशिक्षण लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. सीपीआर तंत्राचे महत्व पटवून हे तंत्रज्ञान केवळ वैद्यकीय कौशल्य नाही तर प्रत्येकाने शिकावे असे जीवन वाचवणारे कौशल्य आहे असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या कौशल्य प्रशिक्षणास मोठा प्रतिसाद मिळाला.

देशभर वैद्यकीय क्षेत्रातील जीवन वाचवणारे कौशल्य प्रशिक्षण व जनजागृतीसाठी प्रेरणादायी कार्य करणारे स्व. डॉ. आनंद शाडिल्य यांच्या स्मृती प्रित्यर्थ २१ जुलै रोजी संपूर्ण देशभर एकाच दिवशी जीवन वाचविण्याचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येते. या अनुषंगाने लातूरच्या भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना यांच्या पुढाकारातून लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयात बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या अध्यक्षा डॉ. व्ही. डी. केंद्रे (कांदे) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण समन्वयक डॉ. दिपीका माशाळकर यांच्या नेतृत्वात डॉ. शितल भट्टड, डॉ. विशाखा पडिले, डॉ. नैना गोडबोले यांनी प्रशिक्षणार्थींना मौलिक मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात पन्नासहून अधिक प्रशिक्षित डॉक्टर्स सहभागी झाले होते.



हृदय विकाराचा झटका आल्यास किंवा श्वासोश्वास बंद पडल्यास आपत्कालीन परिस्थीतीत प्रत्येक सेकंद महत्वाचा असतो, वैद्यकीय मदत पोहचेपर्यंत जीवन वाचवणारे कौशल्य वेळेवर देण्यात आले तर रुग्णांच्या जिवीताची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढू शकते. छातीवर दाब द्या या मुलभूत जीवनरक्षक पद्धतीवर विशेषभर देण्यात आला. सीपीआर देण्याचे महत्व तसेच योग्य पद्धतीने छातीवर दाब, कृत्रीम श्वसनाची प्रक्रिया आणि आपत्कालीन परिस्थीतीत प्रतिसाद कसा द्यावा याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एन. नागोबा, रुग्णालय अधिक्षक डॉ. भागवत जाधव, डॉ. चंद्रकला पाटील यांच्या सहकार्यामूळे आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. गायत्री, डॉ. प्रथमेश, डॉ. विवेक यांनी महत्वपूर्ण भुमिका बजावली. जीवन वाचवणारे कौशल्य शिका, त्वरीत कृती करा आणि जीव वाचवा हा संदेश देत जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न प्रशिक्षण कार्यक्रमात करण्यात आला.

### इस्त्रायलमध्ये रोजगारासाठी निवडलेल्या उमेदवारांना इस्त्रायली मानकांनुसार निवासी प्रशिक्षण

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील युवकांना दर्जेदार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत इस्त्रायलमध्ये रोजगारासाठी निवड झालेल्या उमेदवारांना तेथील कामकाजाच्या पद्धती, गुणवत्ता निकष आणि व्यावसायिक अपेक्षांशी सुसंगत बनविण्यासाठी इस्त्रायली मानकांनुसार निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या निर्णयानुसार, इस्त्रायलमधील प्लेसमेंटसाठी निवड झालेल्या पहिल्या गटातील १०६ उमेदवारांना दि. २७ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६ या कालावधीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ऊघ), औंध, पुणे येथे पाच दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये इस्त्रायलमध्ये सेवा क्षेत्रातील रोजगारासाठी निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश आहे. या उमेदवारांना संबंधित व्यवसायातील इस्त्रायली मानके, कामाच्या ठिकाणी पाळावयाची सुरक्षितता व गुणवत्ता मानके, आधुनिक बांधकाम पद्धती, व्यावसायिक शिस्त, कार्यसंस्कृती तसेच परदेशातील कामकाजासाठी आवश्यक कौशल्यांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.



# अमृत सूर्यमित्र निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाचा लातूर येथे समारोप

## सौरऊर्जा क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधींचा लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/ प्रतिनिधी:** अमृत आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथील आयटी पार्क येथे आयोजित १८ दिवसीय निवासी अमृत सूर्यमित्र प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. सौरऊर्जा क्षेत्रातील वाढत्या संधींच्या पार्श्वभूमीवर युवकांना तांत्रिक कौशल्ये, रोजगाराच्या संधी तसेच स्वयंरोजगारासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळवून देणे, या मुख्य उद्देशाने या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास ऑनलाइन माध्यमातून अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, मंगेश खाडिलकर, अमित सामंत, एमसीईडीचे राज्य समन्वयक श्रीकांत कुलकर्णी, विभाग प्रमुख प्रदीप इंगळे तसेच विभागीय अधिकारी सुदाम थोटे यांनी सहभागी होऊन प्रशिक्षणार्थींना मोलाचे मार्गदर्शन केले. सौरऊर्जा क्षेत्राचे वाढते महत्त्व अधोरेखित करत या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध संधींचा युवकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक प्रवीण कस्तुरे उपस्थित होते. त्यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना, प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून स्वतःचा रोजगार अथवा स्वयंरोजगार सुरू करावा, असे मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी अमृतचे जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर व चिंतेश जोशी, एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी दीपक गायकवाड व अमोल दिवेकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

अमृत सूर्यमित्र प्रशिक्षण कार्यक्रमामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये सौरऊर्जा क्षेत्रातील तांत्रिक कौशल्या बरोबरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने मोठा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. या प्रशिक्षणादरम्यान मिळालेले तांत्रिक ज्ञान आणि व्यावहारिक अनुभव यांचा उपयोग करून प्रशिक्षणार्थींनी भविष्यात सौरऊर्जा क्षेत्रात आपले करिअर घडवावे आणि इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, असा संदेश या वेळी देण्यात आला.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणार्थींनी आनंद व्यक्त करत अमृत व एमसीईडीच्या या उपक्रमामुळे सौरऊर्जा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी नवी दिशा व प्रेरणा मिळाल्याचे सांगितले.

# १५ ऑगस्ट पूर्वी महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ओळखपत्र व ड्रेस कोड सक्ती करा अन्यथा पूर्व भाग कृती समितीचा धरणे आंदोलनचा इशारा

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने लातूर शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड व गळ्यात ओळखपत्र सक्ती करिता महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आली ठोस उपाययोजना होत नसल्याने आज पुन्हा लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने आयुक्तांची प्रतक्ष भेट घेऊन ड्रेस कोड ओळखपत्र सक्तीचे निवेदन देण्यात आले निवेदनात मनपा कार्यालयात २० विभाग असून या विभागात अनेक कर्मचारी कामावर आहेत वेळोवेळी या कर्मचाऱ्यांच्या बदल्या विविध पदावर होतात स्थानिक स्वराज्य संस्था ही स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन नागरी समस्येवर उपाय योजना राबवित असते त्याचाच भाग म्हणून लातूर शहर महानगरपालिका कार्यालय अंतर्गत ऐकून २० विभाग आहेत विभागात २० विभाग प्रमुख,वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक,शिपाई , व मजूर काम करतात या विभागात विविध कामाकरिता नागरिक --- ४ क्षत्रीय अधिकारी कार्यालय, महानगरपालिका हॉस्पिटलमध्ये, स्वछता निरीक्षक,महानगरपालिका शाळेत, व महानगरपालिका कार्यालयात काम करिता येतात यावेळी बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या गळ्यात ओळखपत्र नसतात तर कुठल्या कामाकरिता कुठल्या कर्मचाऱ्यांना भेटायचे हे नागरिकांना लक्षात येत नसल्यामुळे नागरिकांना समस्या निर्माण होत असल्याने महानगरपालिका कामात सुलभता यावी या करिता पदानुसार लातूर शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ड्रेस कोड व गळ्यात ओळखपत्र सक्तीचे करण्यात यावे सदरचे निवेदने देण्यात आली पण सकारात्मक कार्यवाही होत नाही विषयानुसार तात्काळ कार्यवाही नाही झाल्यास लोकशाही मार्गाने दिनांक दिनांक १४/०८/२०२६ रोजी महानगरपालिका कार्यालय समोर बेमुद्दत धरणे आंदोलन आंदोलन छेडण्याचा इशारा लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने देण्यात आला निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे,सचिव बाबासाहेब बनसोडे,गौतम ससाणे,कमलाकर कांबळे ,भगवेश्वर धनगर , मुकुंद बनसोडे यांच्या स्वाक्षऱ्या होत्या



### साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी



**लातूर/ प्रतिनिधी:** पीपल्स अँड चिल्ड्रन्स मल्टीपर्पज वेल्फेअर एज्युकेशन सोसायटी, लातूर संचलित साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वारकरी परंपरेचे जतन व विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, संस्कार आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजविण्याच्या उद्देशाने शाळेच्या परिसरात भव्य वारकरी दिंडीचे काढण्यात आली.

या दिंडीचे उद्घाटन मा. भालचंद्र सोनकांबळे तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि आषाढी एकादशीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले.

दिंडीत विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात, भगव्या पताका हातात घेऊन ''ज्ञानोबा-तुकाराम'' तसेच ''जय हरी विठ्ठल''च्या जयघोषात परिसर भक्तिमय केला. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने आणि शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीत सहभाग नोंदविला.

### साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचा वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न; महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते दिंडीचे उदघाटन



**लातूर/ प्रतिनिधी:** आषाढी एकादशीचे औचित्य साधून साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, लातूर येथे वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या दिंडीचा शुभारंभ लातूर महानगरपालिकेच्या महापौर सौ. जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज कालिदास माने, प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने, मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्र्वर, संत तुकाराम, विठ्ठल-रुक्मिणी आदींची वेशभूषा साकारून टाळ-मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जयघोषात अवंती नगर, कुलस्वामिनी नगर आणि सोना नगर परिसरातून दिंडी काढली. चल चल पंढरीला जाऊ या गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य विशेष आकर्षण ठरले.

पालखी पूजन, रिंगण सोहळा आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संतांचे विचार आणि भारतीय संस्कृतीचे संस्कार अनुभवण्याची संधी मिळाली.

### माऊली विद्या भवन मध्ये आषाढी दिंडी उत्साहात संपन्न



**लातूर/ प्रतिनिधी:** येथील बोधे नगर येथे पायाभूत विकासाचा शैक्षणिक प्रकल्प म्हणून परिचित असलेल्या माऊली विद्या भवन येथील विद्यार्थ्यांनी दि.२४/०७/२०२६ वार शुक्रवार रोजी आषाढी दिंडी काढली.

पंढरपूरचा विठोबा म्हणजे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होय. त्या परंपरेतील संस्काराची जाणीव व महत्व बालवयापासूनच होण्यासाठी दरवर्षी विद्यालयात आषाढी दिंडीचे आयोजन करण्यात येते. या दिंडीत वारकऱ्यांच्या वेशभूषेत चिमुकले विद्यार्थी पालकांसमवेत जोशी काकू व त्यांचा चमू सहभागी झाले होते. विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल चा जयघोष प्रत्येकाच्या मुखी होता. टाळ मृदुंगांची मंजुळ ध्वनी सर्वांच्या कानावर पडत होती. या दिंडीमध्ये सर्वजण मंत्रमुग्ध होऊन चालत होते. या नयनरम्य सोहळ्यामध्ये गायकवाड शंकर उमेश व आदमाने श्रावणी लिंबराज यांनी विठ्ठल व रुक्मिणीची तर चौरे वरद व मोडीवाले शिवांश यांनी संत तुकाराम व संत ज्ञानेश्वराच्या वेशभूषा साकारल्या होत्या.विद्यालयातील चिमुकल्यांनी ''तुझ्याविन वैकुंठाचा कारभार चालना'' या गीतावर मंत्रमुग्ध करणारे नृत्य सादर केले. घरापुढे दिंडी आल्यानंतर महिला भाविकांनी विठ्ठल रुक्मिणीची भक्ती भावाने पूजा करून पालखीचे दर्शन घेतले. भजनी मंडळ यांनी भक्तिमय अभंगांनी मंत्रमुग्ध केले.दिंडीची सांगता वारकरी भजनी मंडळाच्या हस्ते विठ्ठलाच्या आरतीने करण्यात आली व त्यानंतर सर्व उपस्थितांना प्रसाद वाटपही करण्यात आले.

या दिंडीमध्ये संस्था सचिव श्री गंगाधर आरडले, कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील,प्राचार्या कविता आरडले ,उपप्राचार्या काळे भाग्यश्री,मुख्याध्यापक श्री.राठोड प्रकाश, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीम.चेगे प्राजक्ता संपूर्ण शिक्षक वृंद, कर्मचारी ,पालक , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले, कॅप्टन्स व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.